प्रकरण सहावे

उपसंहार

उपसंहार

अशारितीने एकूण पाच प्रकरणांमध्ये 'भैनाळ' आणि 'बस्तान' या कादंबऱ्यातील ग्रामीण समाजजीवनाचे आकलन या दृष्टीने अभ्यास केला. या शेवटच्या प्रकरणामध्ये हाती आलेले निष्कर्ष उपसंहारमध्ये मांडावयाचे आहेत. एखाद्या कलाकृतीकडे पहाण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असू शकतो आणि त्याचे निष्कर्षही विविध निघू शकतात. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असू शकतात. त्यामुळे त्याच्या अभ्यासाच्या आणि एखाद्या गोष्टीकडे पहाण्याचा दृष्टिकोनही निराळा असतो. त्याची विचार करण्याची पद्धती वेगळी असते. या लघुशोधप्रबंधिकेमध्ये भैनाळ आणि बस्तान या कादंबऱ्यांत येणारे ग्रामीण जीवनाचे आकलन या दृष्टीने प्रस्तुत पाच प्रकरणामध्ये विविध मुद्यांच्या आधारे अभ्यास केला आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये ग्रामीणता म्हणजे काय? या संकल्पनेचा अभ्यास करण्यात आला. त्याचप्रमाणे ग्रामीण संवेदनशीलतेचे स्वरूप काय आहे हे पाहिले. संवेदनशीलता म्हणजे काय हेही पाहिले. मराठी ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीपाठीमागे असणाऱ्या विविध प्रेरणांचा विचार केला. मराठी कादंबरीच्या वाटचालीचा थोडक्यात आढावा घेतला आहे. या प्रकरणामध्ये हाती आलेले काही निष्कर्ष खालीलप्रमाणे,

१. ग्रामीणता म्हणजे जीवन जगण्याची रीत आहे. ही एक संस्कृती आहे. यामध्ये विविध उत्सव साजरे केले जातात. तेथील समाजाची जीवन जगण्याची पारंपरिक पद्धत आहे आणि ती कृषिसंस्कृतीमध्ये सामावलेली आहे असे आढळून आले.

२. ग्रामीण संवेदनशीलतेचा विचार करता ती शहरी संस्कृतीहून निराळी आहे असे आढळून आले.

३. मराठी ग्रामीण कादंबरीच्या निर्मितीपाठीमागे विविध प्रेरणा प्रवृत्ती आहेत यामध्ये महात्मा फुल्यांची प्रेरणा ही सर्वात जाज्वल आणि प्रभावी ठरली आहे. त्याचबरोबर विविध व्यक्तींच्या व तत्कालीन काही ठळक घटना घडामोडी साहित्यनिर्मितीस कारणीभूत ठरलेल्या आहेत. हे अभ्यासाअंती निदर्शनास आले.

४. ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करत असताना असे लक्षात आले की १९०३ सालची पिराजी पाटील ही मराठीतील पहिली कादंबरी आहे. यानंतरच्या तिच्या वाटचालीमध्ये विविध टप्प्यांवर ग्रामीण कादंबरी बदलत गेली आहे असे आढळून आले.

५. मराठी ग्रामीण कादंबरीच्या वाटचालीमध्ये मुख्यत: तीन टप्पे पडतात. पहिल्या टप्प्यामध्ये रा. वि. टिकेकरांचे साहित्य येते. तर दुसऱ्या टप्प्यावर र. वा. दिघे आणि गो. नी.

दांडेकरांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे तिसऱ्या टप्प्यामध्ये आनंद यादव आणि रा. रं. बोराडे यांचाही उल्लेख महत्त्वाचा वाटतो आणि हा तिसरा टप्पा अजून पुढे सरकतच आहे आणि मराठी ग्रामीण कादंबरीचे भवितव्य उज्ज्वल आहे हेच या ठिकाणी आढळून आले.

६. ग्रामीण कादंबरी ही विविध प्रेरणेने बदलत्या स्वरूपाने आणि विविध टप्प्यांवर सतत बदलत आहे. हे या प्रकरणामध्ये प्रकर्षाने जाणवले.

७. १९६० नंतर मोठ्या प्रमाणात ग्रामीण समाजजीवन वास्तववादी दृष्टीने चित्रित होताना दिसते. ग्रामीण कादंबरी अशा अंशाने बदलत गेलेली दिसते.

दुसऱ्या प्रकरणामध्ये 'भैनाळ' आणि 'बस्तान' या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने सामाजिक जीवनाचा अभ्यास करण्यात आला आहे. यामध्ये समाजामध्ये असणाऱ्या रूढी-परंपरा, त्यांना समाजजीवनामध्ये असणारे स्थान, विविध श्रद्धा, अंधश्रद्धांचा समाजावर असणारा प्रभाव, शेतीवाडीविषयी असणारे प्रेम, शेतीची झालेली दुर्दशा त्याचबरोबर समाजामध्ये निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या यांचा या प्रकरणामध्ये अभ्यास केला आहे. या सर्वांमधून ग्रामीण समाजजीवन समजण्यास मदत होते. या प्रकरणामधून हाती आलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे,

१. 'भैनाळ' आणि 'बस्तान' या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने ग्रामीण समाजजीवनाची आठवण करत असताना सामाजिक जीवन या दुसऱ्या प्रकरणामध्ये असे आढळून आले की ग्रामीण समाजमनावर धर्माचा प्रचंड प्रभाव आहे. या प्रभावामुळेच मिळालेल्या पूर्वसंकेतामुळे त्यांच्यापर्यंत चालत आलेल्या रूढी-परंपरांना भक्कम स्थान प्राप्त झाले आहे आणि समाज त्या रूढी-परंपरा प्राणपणाने जपताना दिसतो. त्याचप्रमाणे त्या रूढी-परंपरांचे पालन करत असताना स्थळ-काळ परिस्थितीनुसार त्याच्या स्वरूपामध्ये बदल झाल्याचे दिसून येत असले तरी रूढी-परंपरांना त्याच्या जीवनामध्ये मोलाचे स्थान असते हे निश्चितपणे सांगता येते. समाजमध्ये संबंध प्रस्थापित होण्यासाठी त्यांना या गोष्टींचा उत्तम उपयोग होतो असे आढळून आले. समाजामध्ये अनेक प्रकारच्या रूढी-परंपरा समाजमनामध्ये असताना हे आढळून आले.

२ धार्मिकतेच्या प्रभावामुळेच श्रद्धा-अंधश्रद्धांना समाजामध्ये एक महत्त्वपूर्ण स्थान असते. ते शिक्षित आणि अशिक्षित दोन्हीही प्रकारच्या व्यक्तींमध्ये यांचा प्रभाव दिसून आला. समाजात असणाऱ्या अनेक ज्ञात-अज्ञात गोष्टींवर समाजाचा प्रचंड विश्वास असतो. त्यातुनच श्रद्धा-अंधश्रद्धांना बळकटी मिळत जाते असे आढळून आले.

३. ग्रामीण समाजजीवनामध्ये शेतीला अतिमहत्त्वाचे स्थान असते; हेही यामध्ये दिसून आले.

४. ग्रामीण समाजजीवनात बदलत्या परिस्थितीमुळे सुबकता आली आणि त्याचबरोबर समृद्धीपण

आली पण समृद्धीमधूनच ग्रामीण समाजमन ढवळून निघाले. विविध समस्या निर्माण झाल्या. हे 'भैनाळ' आणि 'बस्तान'मध्ये प्रकर्षाने दिसून आले.

तिसऱ्या प्रकरणामध्ये 'भैनाळ' आणि 'बस्तान' या कादंबऱ्यामधील कौटुंबिक जीवनाचा अभ्यास केला आहे. यामध्ये समाजात आढळून येणारे कौटुंबिक संबंधाप्रमाणेच कुटुंबे आढळून आली. ग्रामीण समाजामध्ये कुटुंबाला एक महत्त्वाचे स्थान आहे. ते स्थान टिकविण्याचा प्रयत्न काही ठिकाणी होताना दिसतो. कुटुंब हा समाजाचा एक भाग आहे. कुटुंबामध्ये एकमेकाच्या प्रगतीला वाव दिला जातो. हातभार लावला जातो. पण काही ठिकाणी ही प्रवृत्ती लोप पावत असल्याची चिन्हे दिसून आली.

१. या प्रकरणामध्ये ग्रामीण कौटुंबिक जीवनाचा अभ्यास करताना असे आढळून आले की, खेड्यातील प्रत्येक कुटुंबाचे विघटन घडून येत आहे. औद्योगिकीकरणामुळे शेतीच्या बदलत्या स्वरूपामुळे खेड्यातील समाजसंस्कृती बदलती आहे. त्याचप्रमाणे शेतीचे असणारे महत्त्व कमी होऊ लागले आहे. यामुळे तरूण नोकरीच्या शोधार्थ शहरात भटकू लागला आहे आणि त्याला शहरी संस्कृतीचा पायरव त्याच्या जीवनावर जाणवू लागला आहे आणि खेड्यातील कौटुंबिक जीवनामध्ये बदल घडून आल्यामुळे मोठ्या कुटुंबाचे महत्त्व आपोआपच कमी होऊ लागले आहे. प्रगतीच्या नावावर विभक्त होणाऱ्या कुटुंबांची संख्या वाढू लागली आहे असे याठिकाणी आढळून आले.

२. या बदलत्या कौटुंबिक स्वरूपामुळे नातेसंबंधाचे स्वरूप देखील बदलते आहे. नातेसंबंधामध्ये ताण-तणावाबरोबरच संघर्षसुद्धा निर्माण होतो आहे. याचे साम्र्याने दर्शन 'बस्तान' या कादंबरीमधून घडते. त्याचप्रमाणे नात्यामध्ये भावनिक संबंधापेक्षा आर्थिक सबलतेचे महत्त्व वाढू लागले आहे. हेही याठिकाणी प्रकर्षाने नजरेस आले. 'भैनाळ'मधील नातेसंबंधामध्ये सहकार्य आणि भावनिक गुंतवणूक असल्याचे आढळले. यामध्ये पती-पत्नीचे नातेसंबंध, भावाभावातील नातेसंबंध, आई-मुलगा यांचे नातेसंबंध, मामा-भाचे संबंध असे विविध पातळीवरचे कौटुंबिक नातेसंबंध आढळले.

३. या बदलत्या स्वरूपामधून माणुसकीचे संदर्भ देखील बदलले आहेत. संवेदनशीलता हा ग्रामीण समाजजीवनाचा प्राण आहे, पण १९८० नंतरच्या सामाजिक, आर्थिक धोरणाचा परिणाम ग्रामीण समाजामध्ये दिसू लागला आहे. हेच या प्रकरणाचा अभ्यास करत असताना आढळून आले. ग्रामीण समाजामध्ये माणुसकी हरवत चाललेला समाज मोठ्या प्रमाणात दिसू लागला आहे. परंतु आजही काही व्यक्तींच्या ठिकाणी माणुसकीचे दर्शन घडते आहे याचे चित्रण याठिकाणी घडून आले.

४. त्याचप्रमाणे ग्रामीण समाजजीवनामधील दु:खाचे अनेक पैलू या ठिकाणी आढळून आले. मानवी समाजजीवन दु:खाने भरलेले आहे. हेच या ठिकाणी अनुभवास आले.

अशारितीने 'समकालीन ग्रामीणता' या चौथ्या प्रकरणामध्ये दोन्ही कादंबऱ्यांमध्ये समकालीन काळाचा प्रभाव लेखकानी घडविलेला आहे. औद्योगिकीकरणामुळे गावे बदलत चालली आहे. या बदलाचा परिणाम समाजावर होताना दिसतो आणि गावावरही होतो. खेड्यांची होणारी प्रगती ही विकासाची सूज आहे की काय याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. पण रोजीरोटीच्या चक्रात अडकलेला समाज दिशाहीन झाला आहे. यातून अनेक समस्या समाजाला भेडसावत आहेत. याचे चित्रण या दोन्ही कादंबरीतून घडते. काही ठिकाणी समाज हा संक्रमण अवस्थेत अडकलेला दिसतो. ग्राम विरूद्ध नगर हा अनादिकालापासून चालत आलेला संघर्ष अजून तसाच आहे. नगर संस्कृती ग्राम संस्कृतीवर जोराने चढाई करताना दिसते आहे. शहराची होणारी भरभराट ही ग्रामीण भागात हळूहळू शिरकाव करत आहे आणि ग्रामीण समाजसंस्कृती बदलते आहे; याचे या दोन कादंबऱ्या चित्रण करतात.

१. खेडी आणि शहरामध्ये झपाट्याने बदल होत आहे. याचा समाजजीवनावर होणारा परिणाम दिसून आला. या होणाऱ्या परिणामामुळे अनेक तरूण बेरोजगार होत आहेत याचीही जाणीव झाली. ग्रामीण समाजाचा मुख्य व्यवसाय शेती हा नष्ट होण्यास अनेक कारणे कारणीभूत आहेत हे यामध्ये दिसून आले. यावर जगणारी नवीन बांडगुळे निर्माण होत आहेत हेही दिसून आले. तर ग्रामीण भागामध्ये नवनवीन व्यवसाय निर्माण होत आहेत हेही दिसून येते.
२. ग्राम विरूद्ध नगर हा अखंड चालू असणार संघर्ष या दोन मानसिकतेमधील फरक आहे. हे जर असेच चालू राहिले तर एक दिवस असा उजडेल की दोन्हीही समाज उध्वस्त होतील आणि नवीन समाजसंस्कृती उदयास येईल असे आढळून आले.
३. या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये भ्रष्टाचारासारख्या अनेक समकालीन समस्यांचा समाजजीवनावर होणार परिणाम दिसून आला.
४. ग्रामीण समाजजीवनाचे अनेक परिमान बदललेले दिसून आले. काळानुरूप मोठ्या प्रमाणात ग्रामीण समाजजीवन बदलत आहे. याचा अनुभव या ठिकाणी आला.

'भाषा' या पाचव्या प्रकरणामध्ये दोन्ही कादंबऱ्यातील भाषेचा अभ्यास केला आहे. यामध्ये असे दिसून आले की, कादंबरीमध्ये संवादासाठी आणि निवेदनासाठी ग्रामीण बोलीभाषेचा वापर केला आहे. तर काही ठिकाणी मध्यमवर्गीय प्रमाण भाषेचा उपयोग गरजेपुरता केल्याचे जाणवते. डॉ. बाबुराव गुरव आणि मोहन पाटील यांनी सांगली, कोल्हापूरकडील ग्रामीण बोलीभाषेचा वापर केलेला आहे. कादंबरीतील वाक्यरचना साधी, सरळ, सोपी आणि

सुटसुटीत होण्यासाठी छोट्या छोट्या वाक्यांचा वापर केलेला आहे. यामुळे कादंबरीच्या आकलनास बरीच मदत होते. एखाद्या घटनेचे अथवा व्यक्तीचे वर्णन करीत असताना त्या घटनेचे अथवा व्यक्तीचे संपूर्णपणे चित्ररूप वर्णन आपल्या डोळ्यासमोर उभे ठाकते. इतक्या ताकदीने ते माफक शब्दात व्यक्त करतात. यावरून दोन्ही लेखकांच्या ठिकाणी सूक्ष्म निरीक्षण शक्तीचे दर्शन घडते. संवाद लेखनातून मानवी स्वभाव, सामाजिक प्रश्न, बोलण्याच्या लकबी येथे स्पष्टपणे जाणवतात. यातील संवाद प्रसंगानुरूप, व्यक्तीनुरूप बदलतात. उपमा आणि प्रतिमांच्याद्वारे ग्रामीण समाजजीवनातील अर्थ स्पष्टपणे जाणवतो. त्याचबरोबर ग्रामीण समाजजीवनामध्ये असणाऱ्या म्हणी आणि वाक्यप्रचार यांचा वापर बेमालूम पद्धतीने करून भाषेला प्रवाहीपणा प्राप्त झाला आहे. या दोन्ही लेखकांच्या ठिकाणी सूक्ष्म निरीक्षण दृष्टीची चुणूक दिसून येते. याचबरोबर काही शिव्यांचासुद्धा वापर लेखकांनी केलेला आहे.

१. या प्रकरणामध्ये भाषेचा अभ्यास करीत असताना निष्कर्षाअंती असे म्हणता येते की, या दोन्ही कादंबरीतील आशय आणि भाषेमध्ये सुसंगतता आणि परस्परपूरकता असते हेच दिसून आले. कारण ज्यांच्यासाठी लिहायचे त्यांना त्यांचा अर्थ कळायचा असेल तर त्याच भाषेत लिहायला पाहिजे. ही मागणी येथे पूर्ण झाली आहे.
२. संवादबोलीसाठी ग्रामीण बोलीभाषेचा वापर अधिक खुबीने केल्याचे आढळून आले.
३. उपमा आणि प्रतिमांमधून भाषेला उठाव प्राप्त झाला आहे.
४. निवेदनाच्या भाषेने कादंबरीच्या आशयाचा पटल उंचावला आहे.
५. समाजजीवनामध्ये आढळणाऱ्या अनेक म्हणी-वाक्प्रचाराचा वापर याठिकाणी दिसून आला.

अशातऱ्हेने एकूण सहा प्रकरणांमध्ये भैनाळ आणि बस्तान या कादंबऱ्यांत येणाऱ्या ग्रामीण समाजजीवनाच्या आकलनाचा अभ्यास करून आलेले निष्कर्ष याठिकाणी मांडण्यात आलेले आहेत.

***

■ संदर्भग्रंथसूची

१. डॉ. यादव, आनंद : 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती जुलै १९९३

२. डॉ. कोत्तापल्ले, नागनाथ : 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध', मेहता प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९९३

३. पवार, गो. मा. : 'साहित्यमूल्य आणि अभिरूची', सांकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९४

४. भोळे, भास्कर : 'आधुनिक भारतातील राजकीय विचार', पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, द्वितीयावृत्ती, २००३

५. जाधव, रा. ग. : 'साहित्य व सामाजिक संदर्भ', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३

६. जोशी, लक्ष्मणशास्त्री : 'मराठी विश्वकोष खंड १०', महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, प्रथमावृत्ती, १९८१

७. डॉ. यादव, आनंद : 'मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती', मेहता प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८५

८. डॉ. ठाकूर, रवींद्र : 'मराठी ग्रामीण कादंबरी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९३ व द्वितीयावृत्ती२००१

९. देशपांडे, कुसुमावती : 'मराठी कादंबरीचे पहिले शतक', मराठी साहित्य संघ, प्रथमावृत्ती, १९७५

१०. डॉ. यादव, आनंद : 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव', मेहता प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १९८१ द्वितीयावृत्ती जुलै १९९३

११. दांडेकर, गो. नी. : 'पडघावली', मौज प्रकाशनगृह, मुंबई, चौथी आवृत्ती, १९७९

१२. पाटील, मृणालिनी आणि इतर (संपादक) : 'समकालीन साहित्य प्रवाह आणि प्रवृत्ती', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १ मे १९८५

१३. डॉ, कऱ्हाडे, सदा : 'भाषा, साहित्यकला आणि संस्कृती', लोकवाङ्मयगृह, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९९

१४. डॉ. आगलावे, प्रदीप : 'समाजशास्त्रीय संकल्पना आणि सिद्धांत', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००१.

१५. डॉ. कुंभार, प्रकाश (संपादक) : ज्येष्ठ साहित्यिक म. भा. भोसले, प्रकाशन अध्यक्ष म. मा. भोसले, ग्रंथसमिती, प्रथमावृत्ती, २००६.

१६. पुंडे, दत्तात्रय तावरे, स्नेहल (संपादक) : 'साहित्यविचार', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९५.

१७. नेमाडे, भालचंद्र : 'साहित्याची भाषा', सांकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८७, द्वितीयावृत्ती १९९८.

***

■ नियतकालिके, विशेषांकसूची

१. पाटील, म. सू. : प्रतिष्ठान, कादंबरी समीक्षा विशेषांक, जानेवारी १९८१

२. डॉ. यादव, आनंद : दै. सकाळ, सप्तरंग पुरवणी, १२ एप्रिल १९९८

३. पाटील, गंगाधर : कथनमीमांसा, अनुष्टूभ, सप्टेंबर-डिसेंबर दिवाळी अंक, १९९१

***

■ आधारभूत कादंबऱ्या

१. डॉ. गुरव, बाबुराव : 'भैनाळ', माया प्रेस ॲण्ड पब्लिसिटी, कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९८६

२. पाटील, मोहन : 'पाचूंदा (बस्तान)', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००२

***

891.463
KOL
T15389